आज श्री राम जीवन चरित्र स्पर्धेची सांगता दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहात होणार

मुंबई : कॅबिनेट मंत्री ,मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून , मुंबईतील शाळेतील विद्यार्थ्यांना प्रभू श्रीरामांच्या आदर्श व्यक्तिमत्वाची माहिती व्हावी म्हणून " प्रभू श्री राम जीवन चरित्र स्पर्धा " आयोजित केली होती. आपल्या पुढील पिढीला श्रीरामचंद्रांच्या आदर्श व्यक्तिमत्वाची आणि रामराज्याची माहिती व्हावी यासाठी १० ते १७ जानेवारी २०२४ दरम्यान 'मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम जीवन चरित्र स्पर्धा', आयोजित करण्यात आली होती. हि स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी ऐच्छिक होती. मात्र विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला होता. या स्पर्धांचा बक्षीस वितरण कार्यक्रम आज १९ जानेवारी २०२४ रोजी दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहात सकाळी ११ वाजता होणार आहे . यामध्ये स्पर्धेतील निवडक चित्रांचे प्रदर्शन आणि निवडक नाटिकांचे सादरीकरण पाहायला मिळणार आहे .कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ लेखक व विचारवंत पद्मश्री रमेश पतंगे आणि प्रख्यात संगीतकार तसेच गीत रामायणाचे सदारकर्ते श्रीधर फडके उपस्थित राहणार आहेत. कॅबिनेट मंत्री दीपक केसरकर, खासदार पूनम महाजन , स्थानिक आमदार पराग आळवणी , आमदार सुनील शिंदे , आमदार राजहंस सिह हेही विशेष उपस्थित असणार आहेत. मुंबईतील ११४६ शाळांमध्ये मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम जीवन चरित्र स्पर्धा घेतली होती . यामध्ये चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, काव्य लेखन स्पर्धा आणि नाट्य स्पर्धा घेण्यात आली होती .

थोडक्यात

दोन आरोपींच्या विरोधात 11 कोटींच्या फसवणूकीचा गुन्हा

मुंबई: जाहिरात तसेच इतर प्रसिध्दी साहित्यापोटी येणे असलेली तब्बल ११ कोटी ११ लाख ९७ हजार ४९८ रुपये रक्कम न देता फसवणूक केल्याच्या आरोपावरून चेंबुर पोलीस ठाणे येथे दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींना अद्याप अटक झाली नसून, हा गुन्हा आता आर्थिक गुन्हे विभागाकडे वर्ग करण्यातला आहे. चेंबूर पोलिसांनी याप्रकरणी भारतीय दंड संहिता कलम ४२०,४०९, ५०६,३४ नुसार गुन्हा दाखल केला आहे. यातील फिर्यादी मनिष तुलसीदास ठक्कर मुलुंड पश्चिम येथे राहतात. त्यांच्याशी ओरीजन १०८ बी ६ वा माळा, ऑफ सायन ट्रॉम्बे रोड, सिंधी सोसायटि, भक्ति भवन जवळ हा व्यवहार करण्यात आला आहे. गेल्या १ जून २०१७ ते १६ जानेवारी २०२४ दरम्यान हा व्यवहार झाला आहे. यातील आरोपींची नावे विकी भगवान वाधवानी आणि अमित भगवान वाधवानी अशी असून, त्यांची फसवणूक झालेली व्यावहारिक रक्कम ही ११ कोटी ११ लाख ९७ हजार ४९८ रूपये इतकी आहे. दरम्यान, हा गुन्हा आर्थिक गुन्हे विभागाने केलेल्या चौकशीअंती दाखल करण्यात आला असुन, नमुद गुन्हा कक्ष -६, जनरल चिटींग-४, आर्थिक गुन्हे विभाग यांना वर्ग करण्यात आला आहे.

'सेव्हनहिल्स'साठी 200 कोटींची तरतूद करा - काँग्रेस

मुंबई: अंधेरी येथील महापालिकेचे सेव्हनहिल रुग्णालय घेण्यासाठी अर्थसंकल्पात 200 कोटी रुपयांची तरतूद करण्याची मागणी काँग्रेसने केली आहे. महापालिकेच्या आगामी अर्थसंकल्पाबाबत महापालिका आयुक्तांनी मुंबईकरांना मूलभूत सुविधांबाबत सूचना पाठविण्यास सांगितले होते. माजी उपमहापौर व काँग्रेसचे सरचिटणीस राजेश शर्मा यांनी आयुक्तांना पत्र लिहून ही मागणी केली आहे. महापालिकेने सेव्हन हिल्स हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीसोबत सेव्हन हिल्समध्ये रुग्णालय बांधून चालवण्याचा करार केला होता. मात्र सर्वसामान्यांना सुविधा देण्यात ही संस्था अपयशी ठरली. यासाठी पालिकेने सेव्हन हिल्स हॉस्पिटलचा करार रद्द केला. ही कंपनी दिवाळखोरीत निघाली होती. सेव्हन हिल रुग्णालय मुंबईसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे सदर कंपनीच्या 100 टक्के अधिग्रहणासाठी 2024-25 या वर्षाच्या अर्थसंकल्पात 200 कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी. अशी मागणी राजेश शर्मा यांनी केली आहे.

महाराष्ट्र मध उत्पादनाचा मोठा हब व्हावा!

वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते मध महोत्सवाचे उद्घाटन

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्रात मध निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात वाव आहे. देशातील पहिल्याच अशा आगळ्या वेगळ्या मध महोत्सवाच्या माध्यमातून राज्य भविष्यात मध निर्मितीचा हब होईल यासाठी कौशल्य विकास, प्रोत्साहन, प्रशिक्षण आणि मध विकत घेण्याची हमी अशी एकात्मिक योजना गावागावात राबवावी, असे मत वने व सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केले.

मधमाशापालन, मध निर्मिती, मधमाशांबाबतचे गैरसमज याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे दोन दिवसीय (दि १८, १९ जानेवारी) मध महोत्सवाचे आयोजन खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन वनमंत्री मुनगंटीवार यांनी केले. खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सभापती रवींद्र साठे, मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आर. विमला, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विभागाचे व्यवस्थापकीय संचालक राजेंद्र निंबाळकर, केंद्रीय खादी व ग्रामोद्योग आयोगाचे संचालक योगेश भामरे, उद्योग विभागाचे उपसचिव कांत पूलकुंडवार, सहसचिव लक्ष्मीकांत ढोके उपस्थित होते.

याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते प्रगतिशील मधपाळ सन्मानाने शेतकरी, सरपंच व गावांचा सन्मान करण्यात आला. यात लातूरचे दिनकर पाटील, अहमदनगरचे राजू कानवडे, महाबळेश्वरमधील मांगर गावचे सरपंच गणेश जाधव, कोल्हापूर जिल्ह्यातील पाटगावचे सरपंच रवींद्र भुजड आणि नुकतीच निवड झालेले गाव घोलवडचे सरपंच यांचा सत्कार करण्यात आला. या महोत्सवाची प्रस्तावना उपमुख्य कार्यकारी अधिकारी बिपीन जगताप यांनी मांडली तर सूत्रसंचालन मृण्मयी भजक यांनी केले.

या महोत्सवातून नागरिक, शेतकरी, विद्यार्थी यांनी मधमाशीच्या जगाचे, जीवन प्रवासाचे आणि तिच्या उपयुक्ततेचे ज्ञान आत्मसात करावे. शिस्तबद्ध आणि सकारात्मक जीवन कसे जगावे याचा धडा मधमाशीच्या कार्यातून मिळतो, असे मत मुख्य कार्यकारी अधिकारी आर. विमला यांनी व्यक्त केले.

शेफ विष्णू मनोहरांचे मधाच्या पाककृतींचे प्रात्यक्षिक

या आगळ्या महोत्सवात मधापासून तयार करण्यात आलेले चॉकलेट, आवळा कॅंडी, जांभूळ, ओवा, सूर्यफूल, तुळशी असे विविध प्रकारचे मध, मधापासून तयार केलेला साबण, सुगंधी मेणबत्त्या तसेच मधमाशीचे जीवन कार्य, मधाची चाचणी तसेच मधपेटी अशा विविध बाबींचे प्रदर्शन भेट देणाऱ्यांच्या ज्ञानात भर घालते. उद्या १९ जानेवारीला सकाळी ११ वाजता मध व आरोग्य यावर परिसंवाद, १२.३० वाजता प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांचे मधापासून विविध पाककृतीचे प्रात्यक्षिक बघायला मिळणार आहे. याचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन खादी व ग्रामोद्योग मंडळाने केले आहे.

मुलुंडकर धारावीकरांना सामावून घेण्यास नाखूष

पालिकेकडे विरोधाची शेकडो निवदने सादर

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महानगरपालिकेची मुलुंड येथील ४६ एकर जमिन व जकात नाका मुलुंड येथील १८ एकर जमिन धारावी पुनर्विकास प्रकल्पास हस्तांतरीत करण्याची शिफारस म्हाडाने राज्य सरकार ला केली आहे. व सरकारने तसे आदेश पालिकेला दिले आहेत. पण मुलुंडकर सरकारच्या या निर्णयाने संतापले असून त्यांनी विरोध करण्यास सुरुवात केली आहे. काल पहिल्याच दिवशी पालिका प्रशासनाला शेकडो मुलुंडकरांची विरोध दर्शवणारी निवेदने प्राप्त झाल्याची माहिती मिळते. हा विरोध कायम राहिला तर मात्र धारावी पुनर्विकास योजनेला खीळ बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

शासनाने धारावी पुनर्विकास प्रकल्प विशेष प्रकल्प म्हणून नोव्हेंबर २०१८ मध्ये घोषित करुन सदर प्रकल्पाला महत्वपूर्ण सार्वजनिक प्रकल्प असा दर्जा देण्यात आला आहे. DAP अंतर्गत विशेष हेतू कंपनीला (धारावी पुनर्विकास प्रकल्प प्रा. लि.) पात्र रहिवाशांसाठी मोफत घरे तसेच सुमारे साडे तीन ते चार लाख अपात्र रहिवाशांसाठी परवडणारी भाडेतत्वावरील घरे बांधायची आहेत. मंत्रिमंडळाच्या २१.०९.२०२२ रोजीच्या बैठकीत मान्य केलेल्या निविदेतील कलम १.५ प्रमाणे धारावी पुनर्विकास प्रकल्प / झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाद्वारे परवडणारी भाडेतत्वावरील घरे बांधण्यासाठी लागणारी जमिन मिळविण्याचा प्रयत्न करेल (on) best effort basis) असे नमूद करण्यात आले आहे. सदर जमिनीच्या भूसंपादनाचा खर्च धारावी पुनर्विकास प्रकल्प प्रा. लि. द्वारे दिला जाईल. राज्य समर्थन करारामध्ये (State Support Agreement) असे नमूद करण्यात आले की, राज्य शासन भूसंपादनासाठी समन्वय करेल, राज्य समर्थन कराराच्या मसुद्याला २१.०९.२०२२ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

मंत्रिमंडळाच्या मान्यतेने ०५.११.२०१८ व दिनांक २८.०९.२०२२ रोजीचे शासन निर्णय निर्गमित करण्यात आले. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार अपात्र झोपडीधारकांना भाडेतत्वावर घरे उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत तसेच पात्र झोपडीधारकांना मोफत घरे उपलब्ध होतील. त्याकरिता जमीनीची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेची मुलुंड येथील ४६ एकर जमिन व मुंबई महानगरपालिकेची जकात नाका मुलुंड येथील १८ एकर जमिन धारावी पुनर्विकास प्रकल्प / झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात यावी. असे आदेश निघाले आहेत. पण मुलुंडकर धारावीकरांना आपल्या वस्तीत सामावून घ्यायला तयार नाहीत.त्यामुळे धारावी प्रकल्प पुन्हा रखडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सरकार हा प्रश्न कसा हताळणार याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्र बनणार देशातील सर्वात मोठ्या डेटा सेंटरचे हब

प्रतिनिधी
■ मुंबई

आयटी पॉलिसी २०१६ मध्ये आली जी २०१९ मध्ये कालबाह्य झाली परंतु मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याचे पुनरुज्जीवन केले आणि आमच्या विभागाने संपर्क साधून डेटा सेंटरशी जोडले. ज्यामुळे महाराष्ट्र हे आयटी क्षेत्रातील देशातील सर्वात मोठे हब बनले जात आहे, असे प्रतिपादन राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी नवी मुंबईतील महापे एमआयडीसीतील डाटा सेंटरच्या सुरु होण्याच्या संकेत वर केले.

नवी मुंबई महापे एमआयडीसीमध्ये मोठी एफडीआय गुंतवणूक येणार आहे. कारण एका बहुराष्ट्रीय कंपनीने येथे सर्वात मोठे डेटा सेंटर उभारण्याचा प्रस्ताव दिला आहे. यामुळे राज्यात थेट परकीय गुंतवणुकीला मोठी चालना मिळू शकते. केवळ एफडीआयच नाही तर यातून राज्याच्या तिजोरीत मोठा महसूलही येईल आणि महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात नोकऱ्याही निर्माण होतील.

अटल सेतू पुलाच्या उद्घाटनानंतर देवेंद्र फडणवीस यांनी घोषणा केली होती की, नवी मुंबई आणि रायगड क्षेत्रात देशातील ६५ टक्के डेटा सेंटरची क्षमता निर्माण झाली आहे. आता नवी मुंबई आणि रायगड प्रदेश भारताचे पुढील मोठे आर्थिक केंद्र बनतील. या प्रदेशात सुमारे ६५ टक्के डेटा सेंटरची क्षमता उपलब्ध करून देण्यात आली आहे. हे क्षेत्र आता आयटी आणि एआय क्रांतीचे साक्षीदार असेल. अलीकडेच, भारतातील सर्वात लांब सागरी सेतू बहुचर्चित अटल सेतू पुलाबद्दल उदघाटन करण्यात आले.

पालिका राबवणार प्रत्येक विभागामधील तीन मंदिरांमध्ये स्वच्छता मोहीम

मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार कार्यवाही सुरु

प्रतिनिधी
■ मुंबई

बृहन्मुंबई महानगर कार्यक्षेत्रातील मंदिर परिसरांमध्ये २२ जानेवारी २०२४ पर्यंत लोकसहभाग आणि श्रमदानातून सखोल स्वच्छता मोहीम (डीप क्लीन ड्राईव्ह) राबविण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला आहे. या स्वच्छता मोहिमेत नागरिकांनी सहभागी होऊन श्रमदान करावे, असे आवाहन महानगरपालिकेच्यावतीने करण्यात आले आहे. दरम्यान, सखोल स्वच्छता मोहिमेचा भाग म्हणून मुख्यमंत्री महोदयांनी मुंबईतील मंदिरांची स्वच्छता आणि रोषणाई करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार, महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. इकबाल सिंह चहल यांनी मुंबई महानगरातील मंदीर परिसर स्वच्छतेकामी सखोल स्वचच्छता मोहीम राबविण्याच्या सूचना दिल्या आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार, पालिकेच्या प्रत्येक परिमंडळातील एका प्रशासकीय विभागात (वॉर्ड) दर आठवड्यात एक दिवस संपूर्ण स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. त्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे स्वतः दर आठवड्यास न चुकता या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवित आहेत. महानगरपालिकेने संपूर्ण स्वच्छता मोहीमेसाठी ६१ मुद्यांचा समावेश असलेली प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) निश्चित केली आहे. महानगरपालिका राबवत असलेली संपूर्ण स्वच्छता मोहीम आता राज्यातील सर्व जिल्हे आणि महानगरपालिका तसेच इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रात 'महास्वच्छता अभियान' स्वरुपात राबविण्याचे निर्देश मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहेत.

या संदर्भात अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. सुधाकर शिंदे म्हणाले की, २२ जानेवारी २०२४ पर्यंत दररोज बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मंदिरांच्या परिसरात सखोल स्वच्छता मोहीम राबविली जाणारी आहे. प्रत्येक प्रशासकीय विभागातील किमान तीन प्रमुख मंदिरांची स्थानिक पातळीवर निवड केली जाणार आहे. परिमंडळ सहआयुक्त, उप आयुक्त, सहायक आयुक्त यांना याबाबतचे निर्देश देण्यात आले आहेत. मंदीर स्वच्छता मोहिमेत मुंबईकर नागरिकांनी सहभागी व्हावे आणि श्रमदान करावे, असे आवाहनदेखील अतिरिक्त आयुक्त डॉ. सुधाकर शिंदे यांनी यानिमित्त केले आहे.

शीव स्थानकाजवळील जुन्या रेल्वे पुलाच्या जागी पालिका व रेल्वेचा नवीन उड्डाणपूल

शनिवार पासून होणार पुलाचे पाडकाम

प्रतिनिधी
■ मुंबई

मध्य रेल्वे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या समन्वयाने शीव रेल्वे स्थानकाजवळ जुन्या रेल्वे पुलाच्या जागी नवीन रस्ता उड्डाणपूल बांधणार आहे त्यामुळे जुना उड्डाणपूल २०.०१.२०२४ पासून पाडून, पुनर्बांधणीच्या कामासाठी वाहतुकीसाठी बंद करण्यात येणार आहे. असे मध्य रेल्वेने जाहीर केले आहे.

मध्य रेल्वेने बृहन्मुंबई महानगरपालिका (एमसीजीएम) यांच्या समन्वयाने शीव रेल्वे स्थानकाजवळ केएम १२/१०-११ येथे विद्यमान रस्ते उड्डाणपूलच्या जागी नवीन उड्डाणपूल (आरओबी) बांधण्याची योजना आखली आहे. प्रकल्पाच्या खर्चासाठीचे २३ कोटी रुपये मध्य रेल्वे तर २६ कोटी रुपये बृहन्मुंबई महानगरपालिका उचलणार आहेत.

भारतीय प्रौद्योगिकी संस्था, मुंबईने त्यांच्या स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्टमध्ये विद्यमान उड्डाणपूल पाडून आणि त्या जागी स्टील गर्डर आणि आरसीसी स्लॅबसह नवीन शीव उड्डाणपूल पुनर्बांधणी करण्याची शिफारस केली. तसेच, विद्यमान छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-कुर्ला दरम्यानच्या प्रस्तावित पाचव्या आणि सहाव्या मार्गाच्या कामात अडथळा निर्माण करणारा जुना उड्डाणपूल पाडून पुनर्बांधणी करणे आवश्यक आहे.

वाहतूक बंद केल्यानंतर २४ महिन्यांच्या आत हा पूल पाडून पुन्हा बांधण्यात येईल असा मानस आहे. सध्या २०.१.२०२४ पासून वाहतूक पोलिस आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मदतीने उड्डाणपूल वाहतुकीसाठी बंद करणे आवश्यक आहे. विद्यमान उड्डाणपूल पाडण्याचे काम २०.१.२०२४ पासून सुरू होईल. हे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या समन्वयाने आणि वाहतूक शाखेच्या मदतीने केले जाईल. प्रस्तावित नवीन उड्डाणपूल हा 'सिंगल स्पॅन सेमी-थ्रू गर्डर्स (२)' ४९ मीटर लांबीचा आणि २९ मीटर रुंदीचा आरसीसी स्लॅब पद्धतीचा पूल असेल. या बाबी लक्षात घेऊन, या भागात लवकरच पायाभूत सुविधांचे ब्लॉक घेण्यात येणार आहेत ज्याची माहिती लवकरच जनतेला कळवण्यात येईल.

परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका

फेर ई-निविदा सूचना मुदतवाढ क्र.१

ठाणे महानगरपालिका, परिवहन सेवेकडील १२ व्होल्ट १५० अे.एच.च्या २०२ नग आणि १२ व्होल्ट १८० अे.एच.च्या १० नग निकामी/स्क्रॅप बॅटरीज अशी एकूण २१२ नग निकामी/स्क्रॅप बॅटरी देऊन नवीन बॅटरीज् बायबॅक पध्दतीने खरेदीकामी एक्साईड मेक मुळ उत्पादक, अधिकृत वितरक यांचेकडुन जा.क्र.ठामपा/पिआरओ/टीएमटी/११४२/२०२३-२४ दि.०५/०१/२०२४ नुसार मागविणेत आलेल्या फेर ई-निविदा सूचनेस मुदतवाढ क्र.१ देणेत येत आहे. सदरील ई-निविदा सूचना व निविदा प्रपत्रे दि. २३/०१/२०२४ रोजी १५.०० वा. पर्यंत अधिकृत संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर उपलब्ध होतील. व शक्य झाल्यास प्राप्त निविदा दि. २५/०१/२०२४ रोजी १६.०० वा. पर्यंत स्विकारलेल्या निविदा ऑनलाईन पध्दतीने उघडण्यांत येतील.

ठामपा/पिआरओ/परिवहन/११९३/२०२३-२४ सही/-
दि.१८.०१.२०२४ परिवहन व्यवस्थापक
PLS VISIT OUR OFF. WEBSITE परिवहन सेवा,ठा.मपा. ठाणे
www.thanecity.gov.in

ॲक्सिस फायनांस लिमिटेड
AXIS FINANCE
ॲक्सिस हाऊस, सी-२, वाडिया इंटरनॅशनल सेंटर, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई – ४०० ०२५.

शुद्धिपत्रक

कृपया ई-लिलाव सूचना दिनांकित १५ जानेवारी २०२४ च्या परिशिष्ट I मध्ये विशेष विस्ताराने वर्णन करण्यात आलेल्या सुरक्षित मालमत्ता असलेल्या टॉवर ५ स्ट्रक्चर "डी-विटा" प्रकल्प, सोहम ट्रॉपिकल लगून, कावेसर, ठाणे जे च्या जाहीर लिलावाशी संबंधित ई-लिलाव सूचना दिनांकित १५ जानेवारी २०२४ प्रसिद्ध झाली होती त्या संदर्भात.

नमूद ई – लिलाव विक्री सूचनेमधील शेवटच्या मजकुरामध्ये संवैधानिक विक्री सूचना कालवधी "१५ दिवस" ऐवजी "३० दिवस" असा प्रसिद्ध झाला आहे.

ह्याद्वारे स्पष्ट करण्यात येत आहे की संवैधानिक विक्री सूचना कालावधी कृपया "१५ दिवस" असा वाचण्यात यावा.

ह्यासंदर्भात होणाऱ्या गैरसोयीसाठी दिलगीर आहोत.

प्राधिकृत अधिकारी,
ॲक्सिस फायनांस लिमिटेड

बृहन्मुंबई महानगरपालिका

घन कचरा व्यवस्थापन

ई-निविदा सूचना

बृहन्मुंबई महानगरपालिका (बृमनपा) **"ऑफिसर ऑन स्पेशल ड्युटी (ओएसडी) सेवन हिल हॉस्पिटल आणि एम. एस. कस्तुरबा हॉस्पिटल च्या वाहतुकीसाठीच्या वापरासाठी भाडेतत्वावर नॉन ए. सी. स्विफ्ट डिझायर किंवा तस्तम प्रकारची कार भाड्याने पुरवठा करण्या"**साठी ऑन लाईन मागविण्यात येत आहेत.

बोली महाराष्ट्र सरकारच्या (महाटेंडर्स) (http://mahatenders.gov.in) च्या ई-प्रापण सिस्टमवरून डाऊनलोड करता येतील आणि निविदेची प्रत बृमनपा पोर्टल (http://portal.mcgm.gov.in) वरील ई-प्रोक्यूरमेंट विभागामधून डाऊनलोड करता येतील.

बोली सुरु होण्याचा दिनांक आणि वेळ **१९.०१.२०२४** रोजी **स. ११.०० वा.** नंतर आहे आणि बोली समाप्ती दिनांक **२५.०१.२०२४** रोजी **सायं. ०४.०० वा.** आहे.

बोली कागदपत्रे टपालाद्वारे पाठवली किंवा स्वीकार केली जाणार नाहीत.

पीआरओ/२६३४/जाही/२०२३-२४ सही/-
झाडे लावा, झाडे जगवा कार्य अभि. वाहतूक (शहर) आय/ सी

बाल विकास प्रकल्प अधिकारी, नागरी,
अंधेरी-पूर्व, मुंबई उपनगर यांचे कार्यालय.

जा.क्र.बाविप्रअंपूमुउन / शुद्धीपत्रक/ २०२३ २०२४ / २१ दिनांक : १८/०१/२०२४

शुद्धीपत्रक

एकात्मिक बाल विकास सेवा योजना, अंधेरी-पूर्व, नागरी, यांचे मार्फत गरम ताजा आहार पुरवठा करणेसाठी खुल्या स्पर्धात्मक (रेट टेंडर) पद्धतीने शहरी प्रकल्पातील अंगणाडयासाठी युनिट निहाय Online ई- निविदा सन २०२३ - २०२४ दिनांक ११/०१/२०२४ च्या वर्तमान पत्रात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

"सदर जाहिराती मधील दुसऱ्या परिच्छेदात सदर ई-निविदा https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दिनांक ११/०९/२०२४ पासून प्रसिद्ध करण्यात आलेली आहे असे नमुद आहे."

" त्याऐवजी ई-निविदा https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दिनांक ११/०१/२०२४ पासून प्रसिद्ध करण्यात आली आहे. "असे वाचावे.

सही/-
(सुधीर एच. साळवी),
बाल विकास प्रकल्प अधिकारी,
नागरी, अंधेरी-पूर्व, मुंबई उपनगर
बाल विकास प्रकल्प अधिकारी, (नागरी),
अंधेरी-पूर्व, मुंबई उपनगर

नवी मुंबई महानगरपालिका

जाहीर नोटीस सूचना क्र./वृक्ष प्रा./62/2023-2024

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम 1975 च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या कलम 8(3) अन्वये या नोटीसाव्दारे असे जाहीर करण्यात येते की,

अ. क्र.	अर्जदाराचे नांव व पत्ता	झाडाचा प्रकार	एकूण तोडणे	एकूण स्थलांतरीत	झाड तोडणे/स्थलांतरीत करावयाचे कारण
1.	उप अभियंता स्थापत्य, बी विभाग नेरुळ, नवी मुंबई महानगरपालिका.	पिंपळ पेल्ट्रोफोरम उंबर	1 1 1	0 0 0	सदरची झाडे से.1, शिरवणे गांव जे. एम. श्रॉप कंपाऊड लगत गटाराची सुधारणा करणेच्या कामात अडथळा निर्माण करित असल्याने एकुण 03 नग झाडे तोडणे..

सदर प्रस्तावास वृक्ष तोडणे/स्थलांतरित करण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरीकांच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांच्या आत लेखी स्वरूपात न.मुं.म.पा. शाळा क्र.102, करवे हॉस्पीटलच्या समोर, से.4, नेरुळ, नवी मुंबई या विभागास कळविणे. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या हरकती सूचनांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

जाहीरात प्रसिध्दीचा दिनांक 19 / 01 /2024

सही /-
(दिलीप नेरकर)
उप आयुक्त (उद्यान) तथा सचिव वृक्ष प्राधिकरण
जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/1127/2024 **नवी मुंबई महानगरपालिका**

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
(म्हाडाचा घटक)
म्हाडा MHADA

निविदा सूचना क्र. ६४ (२०२३-२४)

कार्यकारी अभियंता फ (दक्षिण) विभाग, मुंबई ईमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, म्हाडाचा विभागीय घटक, बी.एम.सी. फ. दक्षिण, कार्यालय अनेक्स इमारत, ३रा मजला, परेल, मुंबई ४०००१२ यांचेकडे म्हाडा सिडको/पी.डब्ल्यू.डी/सी. पी. डब्ल्यू. डी/एम. आय. डी. सी./बी.पी.टी./एम. ई. एस. भारतीय रेल्वे किंवा शासकीय / निमशासकीय संस्थेत इतर संस्थेमध्ये योग्य त्या वर्गामध्ये नोंदणी केलेल्या व बांधकामामध्ये अनुभवी असलेल्या कंत्राटदारांकडून बी १ फॉर्ममध्ये [टक्केवारी दर] सिलबंद निविदा मागवित आहोत. ज्यांच्या दुरुस्तीच्या कामासाठी स्तंभ क्र. १० मध्ये दर्शविलेल्या योग्य वर्गाच्या पुनर्रचित इमारती खालीलप्रमाणे.

अ. क्र.	कामाचे नांव	निविदा रक्कम	१% इसारा रक्कम	सुरक्षा अनामत रक्कम	कोऱ्या निविदा विक्रीची रक्कम (विना परतावा रु.१८% GST सह)	कोऱ्या निविदा विक्रीची तारीख व वेळ	मोहरबंद निविदा स्विकृतीची तारीख व वेळ	काम करावयाचा कालावधी	ठेकेदारांचा नोदणी वर्ग
1	2	3	4	5	6	7	8	9	10
१.	उपकरप्राप्त इमारत क्र. १९१-१९१ ए, नवरोज बाग, डॉ. एस. एस. राव रोड, लालबाग, मुंबई फ दक्षिण विभागा अंतर्गत या इमारतीचे दुरस्ती काम करणे [मंडळ निधीचे काम]	९,९६,५५५/-	९९६६.००	२००००.००	५९०.००	दि. २३/०१/२०२४ ते दि. ०२/०२/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.००	दि. ०५/०२/२०२४ ते दि. ०६/०२/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी १.००	१५ महिने	वर्ग ७ व त्यावरील

1. जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्युनतम देकर सादर करणाऱ्यांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत रकक्म ०८ दिवसांच्या आत भरली नाही तर व्दितीय न्यूनतम देकाराच्या निविदाकारास लेखी विचारणा करून त्यानी प्रथम न्युनतम पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असले तर त्याची निविदा मंजूर केली जाईल. अतिरिक्त सुरक्षा अनामत बाबत सविस्तर निविदा सूचना पहावी.
2. कोऱ्या निविदा म्हाडा / मुं.म.पा./ सा.बां. विभाग/ के.सा.बां. वि/रेल्वे / बीपीटीए अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांच्याकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणाकृत व पात्र वर्गात असलेल्या नोंदणी प्रमाणपत्राच्याए पॅन कार्ड व पूर्वी अशा प्रकारची कामे केलेले पुर्वानुभवाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच मिळू शकतील,
3. म्हाडाकडे नोंदणीकृत नसलेल्या ठेकेदारांनी निविदा भरतांना ते कुठल्याही सरकारी किंवा निमसरकारी संस्थेमध्ये काळया यादीत नाव समाविष्ट नसल्याचे नोटरी पुढील शपथपत्र सादर करावे.
4. निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी केलेले सदर करावे.
5. इसारा रक्कम फक्त राष्ट्रीयकृत / शेडयुल बँकेच्या १ वर्षाच्या अल्प मुदतीची अनामत राशी मुख्य लेखाधिकारी मुं.इ.यु. व पु. मंडळ यांच्या नावावर द्यावी.
6. कोऱ्या निविदाच्या प्रती कार्यकारी अभियंता फ[द] विभाग, पद] विभाग तिसरा मजलाए ॲनेक्स बिल्डिंग, म.न.पा. इमारत, परेल, मंबई- १२. यांचेकडून विहित केलेल्या दिनांक व वेळेप्रमाणे कोऱ्या निविदांची विक्री केली जाईल तांत्रिक व आर्थिक लिफाफा हे एका लिफाफामध्ये याच कार्यालयात स्विकृती केली जाईल व मोहरबंद निविदा शक्यतो दि. ०६/०२/२०२४ रोजी दुपारी ३. ०० वाजता नंतर कार्यकारी अभियंता, फ[द] विभाग मुं.इ. दु. व पु.मंडळ यांच्या कार्यालयात उघडण्यात येईल.
7. संयुक्त बोलीदाराची बोली स्विकारजी जाणार नाही.
8. या कामासाठी अशाच प्रकारच्या इमारत बांधकामचा / वास्तु बांधकामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असलेला अभियंता [सिव्हिल इंजिनियर] आणि इतर आवश्यक देखरेख अधिकारी ठेकेदाराकडे असणे आवश्यक आहे.
9. उप ठेकेदाराचा अनुभव आणि त्यांच्याकडील साधने / साधन संपत्ती विचारात घेतली जाणार नाही.
10. एक किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय फेटाळण्याचे अधिकारी सक्षम अधिकाऱ्यांकडे ठेवण्यात येत आहे.
11. मागविण